Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue – 139

## ग्रामीण साहित्य : एक चिंतन

अतिथी संपादक

डॉ. आर. जे. टेमकर

प्राचार्य,

दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

कार्यकारी संपादक

डॉ. जालिंदर कानडे (मराठी विभागप्रमुख)

डॉ. चंद्रकांत काळे

डॉ. सुभाष देशमुख

दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

मुख्य संपादक

डॉ. धनराज धनगर (येवला)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 139 - ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शीर्षक | लेखक/ लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | मराठी ग्रामीण कादंबरीतील सहकाराचे चित्रण | डॉ. सदाशिव सरकटे | 5 |
| 2 | १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील राजकीय चित्रण | डॉ. सुभाष शेकडे | 12 |
| 3 | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | डॉ. माहेश्वरी गावीत | 16 |
| 4 | मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना, स्वरूप व प्रेरणा | डॉ. मच्छिंद्र मालुंजकर | 23 |
| 5 | १९६० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेचा विकास | डॉ. अनिल गर्जे | 32 |
| 6 | गत दशकातल्या ग्रामीण कादंबरीतील राजकीय चित्रण | डॉ. कैलास दौंड | 38 |
| 7 | 'प्रार्थनेची घंटा' मधील समाजदर्शन | प्रा. लक्ष्मण कोठावळे | 45 |
| 8 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरी : प्रेरणा व स्वरूप | डॉ. जालिंदर कानडे | 49 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरी | डॉ. रावसाहेब ननावरे | 52 |
| 10 | १९६० नंतरचे ललित लेख, ललित गद्य : काही निरीक्षणे | डॉ. सुभाष देशमुख | 56 |
| 11 | मराठी ग्रामीण कादंबरी व समाजपरिवर्तन | डॉ. द. के. गंधारे | 58 |
| 12 | मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री संघर्ष | डॉ.चंद्रकांत काळे | 62 |
| 13 | ग्रामीण साहित्य आणि मुकुंदराव पाटील | डॉ.संजय दरवडे | 66 |
| 14 | 'पाणी' धरणग्रास्तांचे जीवन चित्रण करणारी कादंबरी | डॉ. ए.बी.उगले | 70 |
| 15 | मराठी ग्रामीण कथांतील भाषिक वेगळेपण | डॉ. विठ्ठल जंबाले | 75 |
| 16 | मराठी ग्रामीण साहित्याचे स्वरूप व वेगळेपण | डॉ. निवृत्ती मिसाळ | 81 |
| 17 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | डॉ. अशोक डोळस | 83 |
| 18 | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची ग्रामीण कथा : एक शोध | डॉ. सुभाष पुलावळे | 87 |
| 19 | ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप | डॉ. देविदास शेटे | 92 |
| 20 | ग्रामीण कादंबरीतील बदलते स्त्री चित्रण | डॉ. अनिता आढाव | 96 |
| 21 | ग्रामीण साहित्यातील राजकीय चित्रण | डॉ. व्ही. बी. बनसोडे | 101 |
| 22 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता | डॉ. जी. पी. बोडखे | 104 |
| 23 | १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यांचे रचनाविशेष | डॉ. प्रकाश सूर्यवंशी | 107 |
| 24 | ग्रामीण साहित्य : स्वरूप, प्रेरणा आणि वैशिष्ट्ये | डॉ. निलेश खरात | 110 |
| 25 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | डॉ. रंजना कदम | 114 |
| 26 | १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेतील स्त्री भावनांचा आविष्कार | डॉ. वसंत सपकाळ | 119 |
| 27 | मुस्लिम साहित्यिकांच्या ग्रामीण मराठी कथा : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. रमेश खिळदकर | 122 |
| 28 | १९९० नंतरचे मराठी साहित्यातील बदलते संदर्भ | प्रा. डी. बी. हारकर | 125 |
| 29 | मराठी ग्रामीण कादंबरी | डॉ. पोपट सिनारे | 128 |
| 30 | प्रयोगशील कादंबरीकार डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे | श्री. संतराम साबळे | 132 |
| 31 | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | डॉ. संभाजी शिंदे | 135 |
| 32 | इंद्रजित भालेराव यांची ग्रामीण कविता (पीकपाणी व दूर राहिला गाव) | डॉ. कार्तिकी नांगरे | 140 |
| 33 | मरती ग्रामीण कविता | राजेश नेटके | 144 |
| 34 | 'धग' : एक विलक्षण वास्तव | प्रा.महेंद्र पाटील | 147 |
| 35 | ग्रामीण नाटक वाङ्मय | डॉ. राखी सलगर | 152 |
| 36 | मराठी ग्रामीण कथेची वाटचाल | प्रा. पी. टी. कांबळे | 154 |
| 37 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | हरेश शेळके | 157 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 139 – ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# मराठी ग्रामीण कादंबरीतील सहकाराचे चित्रण

डॉ. सरकटे सदाशिव
मराठी विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी
मोबा.९४२००२९११५
ई-मेल- shsarkate@gmail.com

सहकाराने प्रभावित ग्रामीण जनसमूह हा खऱ्या अर्थाने हा स्वातंत्र्योत्तर कालखंडात आकारात आला. सहकारी संस्थानी आपले जाळे स्वातंत्र्योत्तर काळात खेडयापाड्यातील शेवटच्या घटकापर्यंत पसरले होते. या सहकारी संस्थानी ग्रामीण महाराष्ट्र अमूलाग्र स्वरूपात बदलू लागला. नव्वदनंतरच्या नव भांडवलशाहीच्या काळात सहकाराच्या कार्यपध्दतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. हा सर्व व्यवहार ग्रामीण समाजाने अनुभवाचा आहे. ग्रामीण महाराष्ट्र मोठ्या स्थित्यंतरातून जात आहे .यामध्ये सहकाराचे निश्चित मोठे योगदान आहे. सहकाराच्या वाटचालीतील ग्रामीण जीवनानुभवाचे मराठी कादंबरीतील चित्रणाचे स्वरूप अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

स्वातंत्र्योत्तर कालखंड विचारात घेता साठच्या दशकात मराठी कादंबरी अमूलाग्र बदलली. नवनवीन समाजधारणा नवशिक्षित पिढिने कादंबरीच्या क्षेत्रात आणल्या. ग्रामीण साहित्यात कादंबरी या साहित्यप्रकाराने महत्त्वाचे योगदान याच काळात दिले आहे. सहकाराचे थेटपणे चित्रण १९६६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'मी भूमिपुत्र' या कादंबरीत आले आहे. श्रीपाद जोशी यांची ही कादंबरी सहकाराला ग्रामीण महाराष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे हे अधोरेखित करते. गावातील सामान्य शेतकऱ्यांच्या हितासाठी सहकारी सोसायट्या निर्माण झाल्या परंतू तेथील वातावरण भ्रष्टाचाराने कसे पोखरले आहे याची उत्तम निरीक्षणे शंकर खंडू पाटील यांच्या कादंबऱ्यात आहेत. नांदगावात स्थापन झालेल्या सहकारी संस्थाच्या उभारणीपासून ते भरभराटीला आलेल्या संस्थांचे चित्रण 'सरपंच' या कादंबरीत आहे. खांडेकरी प्रभावातील ही कादंबरी ध्येयवादाने प्रेरित नायकाच्या उभारणीने आकाराला येते. त्यामुळे ढोबळ सहकारी संस्थांच्या उभारणीचे चित्रण येते परंतु या संस्थांच्या कारभाराचे, वाटचालीचे तपशीलवार चित्रण येत नाही ही मोठी उणीव या कादंबरीची आहे. असे असले तरी तो काळच सहकारात काम करणाऱ्या भारावलेल्या पिढीचा होता हे या कादंबरीत योग्य पध्दतीने आले आहे.

ना. धो. महानोर यांची 'गांधारी' ही खानदेश मराठवाड्याच्या पार्श्वभूमीवरील निजाम राजवटीनंतरच्या नव्या लोकशाही राजकीय व्यवस्थेतील खेडयाचे तेथील ग्रामव्यवस्थेचे चित्रण करणारी कादंबरी आहे. ही कादंबरी प्रामुख्याने गावच्या राजकारणाने ग्रामपंचायत स्थापन झालेल्या काळाचे खेडयाचे राजकारण चित्रित करते. या कादंबरीत सहकारी सेवा सोसायटीचा कारभार अत्यंत बारकाव्यानिशी आला आहे. सोसायटीमार्फत चालविले जाणारे स्वस्त धान्य दुकान भ्रष्टचारी चेअरमन कसे भ्रष्टाचारी लुबाडतो, त्यावर चौकशी करणारी यंत्रणाही कशी राहते आणि सामान्य माणसाची हतबलता याचे वस्तुस्थितीजन्य चित्रण गांधारीचे विशेष आहे. गावातील सहकार ही गावातील राजकारणी लोकांच्या भ्रष्टाचारी अड्डा आहे हे यातून सुस्पष्ट केले आहे. भुविकास बँक, मार्केटिंग सोसायटी, फ्रुट सेल अशा अनेक मार्गांनी गावे कर्जबाजारी झाली. या संस्थाही डबघाईला आल्या. मोठे बागायदार या संस्थांचे पदाधिकारी आणि तेच मोठे थकबाकीदार यांच्यावर नेमके बोट ठेवले आहे. सहकारी चित्रणाचा उत्कृष्ट नमुना 'गांधारी'तून प्रकटला आहे. पारंपरिक गावगाड्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत, जिल्हा परिषदा आणि सहकारी संस्था या सर्वामधील भ्रष्टाचार त्यामधून गावात शिरलेलं अनितीचे राजकारण यातून गावचे निरागस जग उद्ध्वस्त होते. याचे बारकाव्यानिशी चित्रण येते. सहकाराचे औदार्य, यशापयश हे ते राबविणाऱ्यावर अवलंबून आहे हे 'गांधारी' कादंबरी अधोरेखित करते. स्वातंत्र्योत्तर काळात



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 139 – ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकाराच्या कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या आहेत. असे असले तरी फार मोजक्या कादंबऱ्यातून सहकार चळवळीच्या या कादंब-यांत स्थान मिळाले आहे.

१९७५ नंतर एकूणच मराठी कादंबरी संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या विस्तारलेली आहे. १९६० च्या दशकात नव्या वाटा धुंडाळल्या होत्या. हा आशयाभिव्यक्तीचा नव्या दिशांचा शोध याही काळातील कादंबऱ्यांनी घेतला आहे. याला ग्रामीण कादंबरीही अपवाद नाही. स्थलकालसापेक्ष असणारी ग्रामीण संवेदनशीलतेशी या काळातील कादंबरीने अधिकचे नाते प्रस्थापित केले. यात बदलेल्या ग्रामजीवनातून आलेली डोळस पिढी तसेच याच काळात ग्रामीण साहित्याची चळवळ मूळ धरू लागलेली दिसते. यातूनच या काळात सकस साहित्य निर्मिती झाली. भारतीय पातळीवर राजकीय पटावर घडलेल्या घटना, घडामोडींनी या काळात सामान्य माणासाचे जनजीवन ढवळून निघाले. लोकशाही समाजवादापेक्षा भांडवलशाही उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेकडे देश झुकू लागला. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पिढीचा उत्साह मावळला. तिच्या ध्येयवादाला आणि मूल्यनिष्ठेला उतार लागला सार्वजनिक जीवनातील स्वार्थ परायणता, दहशतवाद आणि भ्रष्टाचार वाढीला लागला. नवी आशा जागविण्याऱ्या सहकारी चळवळी आणि संस्था भ्रष्टाचाराने माखल्या जाऊ लागल्या.

'सिहासन'(१९७७) या कादंबरीत राज्याच्या राजकारणाचे तेही मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ सत्ता स्पर्धेचे राजकारण आहे. प्रमुख विषय तोच असल्याने सहकाराचे ओझरते चित्रण आले आहे. राज्याच्या सत्ताकारणात सहकारातील बडी मंडळी येतात. याचा एक पट 'सिंहासन' कादंबरीत आहे. कृषीमंत्री माणिकराव पाटील हे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष होते. राज्य मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष होण्याची महत्त्वकांक्षा पूर्ण झाल्यानंतर ते सत्तांकाक्षेने सत्तेत पुढे जात राहतात. सहकारी संस्थांची सत्ता राजकीय फायद्यासाठी वापरण्याचे माणिकराव व रावसाहेब हे मुख्यमंत्र्यांचे साडू असलेले कसे वापरतात याचे चित्रण येते. चिरगुट सारख्या खेड्यात राहून जिल्ह्याच्या सहकारी संस्थांच्या सत्तेच्या जोरावर राज्याच्या राजकारणावर कसा प्रभाव पाडतात याचे चित्रण रावसाहेब टोपले या पात्राच्या वाटचालीतून दाखविले आहे. अरुण साधू पत्रकार नामांकित संपादक असल्याने त्यांनी मुंबईच्या राजाच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर जे सहकारातून पुढे आलेले नेतृत्त्व दिसते त्यासंबंधाचे विवेचन या कादंबरीत केले आहे.

'साखर सम्राट'(१९८४) या कादंबरीचे कथानक पश्चिम महाराष्ट्रात घडते. प. महाराष्ट्र हा सहकाराचा सर्वात यशस्वी लाभधारक प्रदेश समजला जातो. या प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर या कादंबरीचे कथानक घडत जाते. सहकाराने या प्रदेशाचा केलेला कायापालट समजून घेण्याचा प्रयत्न या कादंबरीत आला आहे. यातील स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवरील स्वातंत्र्याच्या चळवळीतील 'काकासाहेब' स्वातंत्र्यसेनानी यांनी सहकाराची मुहूर्तमेढ या प्रदेशात कशी रोवली, पुढे सहकारात काय झाले याचे विस्तृत चित्रण ही कादंबरी करते. स्वातंत्र्य चळवळीत काम केलेले नंतरच्या काळात राजकीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात राहण्यासाठी सहकाराचे काम करतात याचे चित्रण 'साखर सम्राट' यामध्ये उत्तम रीतीने आले आहे. काकासाहेब हे पात्र साखर कारखान्याची अनिर्बंध सत्ता आणि यातून इतर संस्थावर जम बसवतात, त्यामधून भ्रष्टाचार याचे चित्रण येते बुवासाहेब तत्त्वनिष्ठ राजकारण करण्यात आघाडीवर त्यांचा सहकारी बँकेतील भ्रष्टाचाराचे खोटे प्रकरण आणून त्यांचा सार्वजनिक जीवनातून काटा काढला जातो यातच बुवासाहेब आत्महत्या करतात. दादासाहेब हे तिसरे पात्र निवडणुकीत काकासाहेबांची मदत घेऊनही त्यांच्या भ्रष्ट राजकारणाला थारा देत नाहीत. गृहमंत्री असताना दोषी काकासाहेबांना अटक करतात व राजकीय संन्यास घेतात. सहकाराच्या पार्श्वभूमीवर हे सर्व कथानक 'साखर सम्राट' या कादंबरीत घडत जाते.

रवींद्र दप्तरदार हे पत्रकार असल्याने त्यांनी सहकार आणि माध्यम व्यवहारातील हितसंबंधाचे वास्तव उलगडले आहे. 'साखर पेरणी'(१९८४) या कादंबरीतील आबासाहेब सहकारी साखर कारखान्यात अडीच लाख रुपयांची अफरातफर झाल्याचा ऑडिट रिपोर्ट असताना 'दिशा' दैनिकाला दरवर्षी याच कारखान्याकडून पंचवीस हजार रुपयांच्या



Scanned with CamScanner

जाहिरात मिळत असतात. हा हितसंबंधाचा व्यवहार जागोजागी दिसतो. याचे विस्ताराने दर्शन या कादंबरीत आले आहे. सहकार लॉबीत सत्ता मिळवून जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्याचे राजकारण कसे केले जाते याचे चित्रण आले आहे. 'साखर पेरणी' या कादंबरीचे वेगळेपण हे की, एकाच पक्षात राहून गटबाजी करत आपापला सहकाराचा गड शाबूत ठेवण्याचे राजकीय कसब आणि त्यातून सहकारी संस्थांचे सत्तासंबंध अधोरेखित केले आहेत.

मधु मंगेश कर्णिक हे मराठीतील एक अग्रगण्य लेखक आहेत. त्यांनी कोकणच्या पाश्वभूमीवरील दलित समाजाने सहकाराच्या माध्यमातून आपला विकास कसा करून घेतला याचे चित्रण 'कातळ'(१९८५) या कादंबरीत केले आहे. गडगेबाव या गावातील महार मंडळी केशव बोत याच्या चिरे खाणीवर राबत असत. या राबणुकीचा योग्य मोबदला त्यांना मिळत नसे, त्यांची लूट होत असे तसेच पैसेही वेळेवर मिळत नाहीत यातून अवधूत हा तरुण या पिडित महारांना एकत्र करून सहकारी तत्त्वावर चिरेखाण सुरू करतो. त्यांच्यातलाच अंकुश हा तरुण या व्यवहारात तरबेज होतो. सरकारी रॉयल्टी जमा करून राहिलेला सर्व नफा समजून ते आपापसात वाटून घेतात. त्यामुळे त्यांची होणारी लुबाडणूक थांबते.सहकाराच्या एका वेगळ्या वास्तवाची नोंद मधू मंगेश कर्णिक यांनी या कादंबरीत केली आहे. पिचलेला जात समूह आपल्या एकीतून कसा स्वतःचा उधार करतो, अडाणी महार या सहकारातून आत्मभानातून जगणे प्राप्त करून घेतात असे चित्रण या कादंबरीत आले आहे. सहकाराची खरी ताकद अशा चित्रणातून कळते. मधु मंगेश कर्णिकांसारखा सिध्दहस्त लेखक 'कातळ' मध्ये सहकाराचे एक उन्नत रूप प्रकट करतो हे या जीवन चित्रणावरून दिसते.

तात्यासाहेब विचारे या मुख्य पात्राचे सहकारात केलेल्या उलाढालीचे चित्रण म्हणजे अरविंद सोनवले यांची 'सहकार सम्राट' (१९८५) ही कादंबरी आहे. जिल्ह्याच्या राजकारणात समाजकारणात बहुसंख्येने असलेला शेतकरी हिताचा विचार केल्याशिवाय जम बसत नाही याचे विस्ताराने दिग्दर्शन कादंबरीत येते. तात्यासाहेब विचारे हे राजकारणी नेमकी ही बाब ओळखून नद्यावर धरणे आणि साखर कारखान्याचे प्रपोजल मंजूर करून घेतात. त्यांचा दबदबा जिल्ह्याच्या राजकारणात तयार होतो. षष्ठब्दी सोहळयाच्य निमित्ताने ते सहकारी संस्थांच्या माध्यमातून राजकीय शक्तिप्रदर्शन करतात. मुख्यमंत्र्यांनी या सोहळयाला उपस्थिती लावून तात्यासाहेबांची भावी वाटचाल अधोरेखित केलेली असते. अरविंद सोनवले यांनी सहकाराच्या चित्रणातून त्यातील राजकारणाचे वास्तव अधोरेखित केले आहे. सहकारी संस्थेतील सत्तेच्या जोरावर जिल्ह्याचे भाग्यविधाते बनलेले श्रीमान तात्यासाहेब हे मुख्य पात्र आहे. साखर कारखाना, सहकारी बँक, खरेदी विक्री संघ, सेवा सोसायटी या माध्यमातून जिल्ह्याच्या सत्तेची सूत्रे तात्यासाहेबांकडे येतात. कार्यकर्ता सांभाळण्याची त्यांची एक खास पध्दत सोनवले यांनी विस्ताराने दिली आहे. तळागाळात सहकारी संस्था कशा पध्दतीने चालविल्या जातात याचे हे उत्तम उदाहरण आहे. कार्यकर्त्यांना काही लाभ देऊन अंतिम स्वार्थ स्वतःचा साधणे हे सहकारचे ब्रीद झाले आहे. विरोधकांना पध्दतशीर नाडवणूक करून संपविण्यासाठी सहकारच वापरले जाते. सोनवले यांची निरीक्षणे मार्मिक पध्दतीने आली आहेत.

वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या'(१९८९) ही या काळातील सहकाराचे चित्रण करणारी महत्त्वाची कादंबरी आहे. सहकारी बँकेत नोकरी करणारा विश्वनाथ हा या कादंबरीचा नायक या संस्थांच्या कार्यशैलीचे जवळून अनुभव घेतो आणि या सहकारी संस्थांची कार्यपध्दतीचे आतून दर्शन वाचकांना होते. मुळात मुलाटे हे ग्रामीण साहित्य चळवळीतील महत्त्वाचे नाव आहे. या समाजजीवनाची अभिव्यक्ती करण्याचे नेमके भान त्यांच्यापाशी आहे. यामध्ये सहकाराचे अंतरंग स्पष्टपणे उलगडले आहेत. सहकार हे सहकारी तत्त्वाने चालविण्यापेक्षा राजकीय हितसंबंधाने चालविले जाते. अगदी बँक कर्मचाऱ्यांच्या बदली, बढती अथवा बडतर्फी या गोष्टीतही राजकीय हितसंबंध उपयोगाला आणले जातात. सहकारी संस्थाच्या सर्वसाधारण सभा या राजकारण्यांच्या प्रचारसभा कशा होतात याचे उत्तम चित्रण या कादंबरीत आले आहे.



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
February-2019

""ग्रामीण भागातील सहकार क्षेत्र स्वाहाकार क्षेत्र कसे बनले आहे याचे वास्तवपूर्ण चित्र म्हणजे 'विषवृक्षाच्या मुळ्या'(१९८९) ही कादंबरी होय. ग्रामीण भागाचा कायापालट घडविण्यासाठी सहकार चळवळ राबविली जात आहे असं आपण म्हणतो. परंतु प्रत्यक्षात खरोखरच तसे घडत आहे का, हा प्रश्न या कादंबरीने उभा केला आहे. आज हा सहकाराचा वृक्ष अमृतवृक्ष राहिला नसून तो विषवृक्ष बनला आहे आणि त्याच्या मुळ्या समाजजीवनाला उत्तरोत्तर कशा पोखरत निघाल्या आहेत याचा प्रत्यय ही कादंबरी घडवते. बदलत्या ग्रामीण वास्तवाचे एक वेगळे रूप या कादंबरीने टिपले आहे."[२०] सहकार क्षेत्राचे वेगळेच रूप या कादंबरीने आविष्कृत केले. सहकारी सेवा सोसायटी, भूविकास बँक, स्वस्त धान्य दुकान, कापूस खरेदी विक्री केंद्र अशा सर्व स्तराच्या सहकारी संस्थाची वास्तव कार्यपध्दतीचे दर्शन लेखकाने घडविले आहे. सभासदांच्या हितासाठी शेतकऱ्यांच्या, सर्वसामान्यांच्या हितासाठी स्थापन झालेल्या या संस्था अंतिमत त्याचीच लूट कशी करतात याचे भेदक चित्रण ही कादंबरी करते.

'पाचोळा' सारखी महत्त्वाची ग्रामीण कादंबरी लिहण्याऱ्या रा. रं. बोराडे यांच्या 'चारापाणी' (१९९०) या कादंबरीत सहकाराच्या वेगळ्या पैलूचे चित्रण आले आहे. दुष्काळाच्या सावटाखाली ग्रामीण जनजीवन आणि शेतकऱ्यांच्या पशुधनाची होणारी परवड यापेक्षा आमदार असणाऱ्या सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनला जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक महत्त्वाची वाटते. राज्य शिखर बँकेवर जायची काळजी वाटते. सहकारातून सामान्य सभासदांच्या हितापेक्षा आपल्या राजकीय हिताला प्राधान्य दिले जाते याचे उत्तम चित्रण 'चारापाणी' या कादंबरीत आहे. सहकारी साखर कारखान्यांनी संमिश्र स्वरूपाचे परिणाम ग्रामीण महाराष्ट्रात घडवून आणले याचेही दिग्दर्शन या कादंबरीत होते.

इ. स. १९७५ ते १९९० पर्यंतच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीत सहकाराचे विविधांगी चित्रण आले आहे. सहकाराच्या उदात्त हेतू असला तरी सहकाराच्या माध्यमातून राजकारण केले जाते. संस्थात्मक हितसंबंधातून ग्रामीण अर्थकारणाच्या नाड्या हातात राहतात. यंत्रणा आयती वापरावयास मिळते. त्यामुळे वरपर्यंतचे राजकारण हाताळता येते. गावच्या गटातटाच्या राजकारणापासून ते राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तारापर्यंतच्या राजकारणाला, त्यातील ध्येयधोरणाला असणारी सहकाराची भूमिका या सर्व घटना, घडामोडींची सुक्ष्म पातळीवरील चित्रण या कालखंडातील कादंबऱ्यातून आले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात बदलत्या राजकारणाचा, सत्ताकारणाचा संबंध ग्रामीण महाराष्ट्रातील सहकार चळवळीला आहे. या बदलाबरोबर सहकाराच्या पडझडीचे गंभीर राजकीय भान ठेवून लेखन करणारे मोजके परंतु महत्त्वाचे कादंबरी लेखन या काळात झाले आहे. समाजातील राजकीय परिप्रेक्ष्यातून सहकार आणि ग्रामीण समाजजीवनाचे प्रगल्भ आकलन या कादंबऱ्यातून आले आहे. आणखी विशेष या कादंबऱ्यांनी सहकाराचे, त्यातील सत्ताकारणाचे तळाच्या पातळीवरचे संदर्भ उलगडले आहेत.

नव्वदच्या दशकात भारतीय समाजजीवन अनेक स्थित्यंतरातून गेले आहे. समाजवादाचा पट विस्तारला आहे. त्याच्या भौतिक बदलाचा वेग तर काही पटीनी वाढला आहे. या साऱ्याला एक मूलभूत चौकट प्राप्त झाली ती नव्वदच्या दशकात. केंद्र सरकारने स्वीकारलेले खुले आर्थिक धोरण. यातून नवी भांडवली आर्थिक रचना समाजात स्थापन होऊ लागली. जागतिकीकरणाबरोबरच खासगीकरण आणि उदारीकरणाने शासनव्यवस्थेची बंधने सैल झाली. मुक्त बाजारपेठेने भांडवलशाहीचा अंमल सुरू झाला व्यक्ती-समाज संबंध बदलले. व्यक्तीची प्रतिष्ठा ग्राहकात झाली. राजकीय समीकरणेही बदलली. समाजवाद, ध्येयवादी राजकारण बाजूला जाऊन भांडवलशाहीच्या काळात तो एक झटपट श्रीमंत होण्याचा व्यवसाय झाला. देशाच्या राजकारणाचातर स्थायी भाव झाला संरमजामी मूल्य अजूनही ग्रामीण भागात मानाची आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सत्ताकारण घराणेशाहीकडे खेचले आहे. गावात सरळसरळ दोन गटात विभागणी झालेली आहे. या पार्श्वभूमीवर गाव चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या येथे विचारात घ्यावयाच्या आहेत. नवोदत्तरी


Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
February-2019

कादंबरीचे सहकार क्षेत्र प्रतिबिंबित करण्याचे नेमके प्रयोजन लक्षात घेणे गरजेचे ठरते. ज्या कादंबऱ्यांनी सहकार चित्रणाचा विस्तृत पट कवेत घेतला आहे याच कादंबऱ्यांची विस्ताराने दखल घेतली आहे.

'ताम्रपट' ही कादंबरी रंगनाथ पठारे यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त महत्त्वाची कादंबरी आहे. ही कादंबरी १९९४ साली प्रसिध्द झाली असली तरी या कादंबरीत १९४२ ते १९७९ पर्यंतचा कालावकाश चित्रित केला आहे. या काळातील महाराष्ट्राच्या पातळीवर तसेच नगर जिल्ह्याच्या पार्श्वभूमीवर राजकीय, सामाजिक आणि सहकारी चळवळीचा अवकाश कवेत घेतला आहे. या सर्व क्षेत्रातल्या संपूर्ण व्यवस्था पकडण्यात ही बृहतकादंबरी यशस्वी होते. हे सर्व खुल्या पध्दतीने न येता त्यातील सेंद्रिय बंध उलगडले आहेत. नगर जिल्ह्याच्या पार्श्वभूमीवर कथानक आकार घेते याला विशेष महत्त्व आहे. कारण सहकाराची पाळेमुळे याच जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व काळापासून आहेत. सहकारी संस्थांमध्ये आपले सत्तास्थापन बळकट झाल्यानंतर दादासाहेब भोईटे-पाटील या सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकाऱ्यांना व नातेवाईक, मित्रमंडळींना छोटी मोठी कामे देऊन त्यांचा वैयक्तिक फायदा करून देतात. शासनाकडून सहकारी सोसायट्यांना उद्योगधंद्यासाठी बऱ्याच सवलती मिळतात. याचाही लाभ या सर्व सहकाऱ्यांनी स्थापन केलेल्या सोसायटींना लाभ मिळून देतात. कारखान्याच्या ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरू करतात. या सर्व सहकारी संस्थांच्या लोकपयोगी कामातून दादासाहेब जिल्ह्याचे नेतृत्व करत खासदार होतात. दिल्लीच्या राजकारणात जम बसवतात. तुकाराम भोईटे-पाटील या व्यक्तिरेखेविषयी आणि एकूणच कादंबरीतील सहकाराविषयी एकनाथ पगार यांचे निरिक्षण विचारात घेण्यासारखे आहे. सहकारातून राजकारण आणि सहकारात घराणेशाही या सर्वांचे वास्तव चित्रण ताम्रपटमध्ये आले आहे. तुकाराम भोईटे या व्यक्तिरेखेचा विकास हा सहकारी चळवळीचे साखर कारखानदारीचे महाराष्ट्रातील प्रातिनिधिक चित्रण आहे.

अण्णासाहेब देशमुख यांची 'फरफट' (१९९५) आणि टी. एस. पाटील यांची 'साखर खाना' (१९९९) चाही याकाळातील कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. 'फरफट' या कादंबरीत राजकारणामध्ये सामान्य कार्यकर्त्यांची फरफट कशी होते हे वामन या पात्राच्या जीवन वाटचालीतून दाखविले आहे. सहकाराच्या राजकीय अंगाने विचार करता या कादंबरीत राजकीय नेते प्रचार सभांना गर्दी जमविण्यासाठी सहकारी संस्थांच्या वाहनांचा कसा वापर करतात याचे तपशीलवार चित्रण येते. राजकारणी स्वतःच्या राजकीय लाभासाठी सहकारी संस्थांचा वापर करतात यावर या कादंबरीत अधोरेखित केले आहे. 'गव्हानी' (२००२) ही शांता जोशी यांची सहकाराच्या एका वेगळ्या पैलूकडे लक्ष वेधणारी कादंबरी आहे. साखर कारखानदारीचा डामडौल विकासाचा दिसत असला तरी प्रत्यक्षात ऊसतोड कामगारांचे कष्टप्रद जीवन फारसे दृश्यपटावर येत नाही. ही दुर्लक्षित बाजू शांता जोशी यांनी चित्रित केली आहे. ऊस तोड कामगारांचे आयुष्य हे मुकादम, टोळी प्रमुख, सहकारी साखर कारखान्याचे एमडी व चेअरमन यांच्या सोयीनुसार गुलाम कसे होते. शेवटी ऊस तोडणीसाठी 'हार्वेस्टर' आणल्याने विस्थापित होण्याची वेळ येते याचे भेदक चित्रण 'गव्हानी' (२००२) कादंबरीत आले आहे.

साखर फेरा (२००६) ही मोहन पाटील यांची महत्त्वाची ग्रामीण कादंबरी आहे. कादंबरीच्या सुरुवातीलाच सहकारी साखर कारखानदाराची वास्तव परिस्थिती नोंदली गेली आहे. सहकारी साखर कारखानदारीतील उलट सुलट बाजू चर्चेला ठेवल्या आहेत. करखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने सत्ताधारी संचालक मंडळे आणि शेतकऱ्यांची संघटना आमने सामने दाखवून लेखकाने सहकारी साखर कारखानदारीतले सर्व स्तरावरचे वास्तव अधोरेखित केले आहे. साखरेच्या आयात निर्यात धोरणांपासून संचालकाचा भ्रष्ट कारभार आणि कारखान्याचा मूळ मालक जो सभासद आहे म्हणजे शेतकऱ्यांच्या माडवणुकीपासून सर्व व्यवहार चर्चिला गेला आहे.

मोहन पाटील हे ग्रामीण कादंबरीतील महत्त्वाचे नाव आहे. त्यांच्या सर्वच कादंबऱ्या कमी अधिक प्रमाणात सहकाराच्या संबंधाने जीवनाशय आलेला आहे. त्यांच्या 'लिगाड' (२००२) या लघु कादंबरीतूनही सहकाराचे चित्रण आले



Scanned with CamScanner

आहे. ऊस उत्पादक शेतकरी (सभासद) आणि त्याच्या कष्टावर उभा असणारा सहकाराचा डोलारा हा कशा पध्दतीने चालतो हे ऊस दर आंदोलनाचा प्रश्न हाताळून या कादंबरीने दाखवून दिले आहे. सहकारी साखर कारखानदार, चेअरमन, संचालक मंडळाची बाजू, शेतकरी संघटनेची बाजू आणि प्रत्यक्ष शेतकऱ्याची चर्चा यातून हा संघर्षमय ताण रेखाटला आहे. येथे महात्मा सहकारी साखर कारखान्याच्या निमित्ताने चित्रित केलेले ऊसदर अंदोलन प्रातिनिधीक आहे. या साऱ्यातून सहकाराचे साखर कारखानदारीचे साखर उत्पादन, विक्री व्यवहार, आयात-निर्यात सरकारी धोरणे, भ्रष्टाचार अशा सर्व बाजूंनी हा संघर्ष चित्रित करून आशयाची वीण घट्ट केली आहे. प्रत्यक्ष शेतीत राबणाऱ्या शेतकऱ्यापासून ते सहकाराचा वापर करत राजकारणात बस्तान बसवलेल्या सत्ताधारी वर्गापर्यंतचा पट साखरफेरात येतो. मोठा अवकाश व्यापणारी ही या काळातील सहकाराने आकारलेला जीवनव्यवहार तपासणारी महत्त्वाची कादंबरी आहे.

सहकाराचा पट (२००६) रंगा दाते हे उच्च विद्याविभूषित असलेले लेखक आहेत. शेतकरी चळवळ आणि प्रत्यक्ष शेती कसणारे शेतकरी आहेत. त्यांनी सहकारी साखर कारखान्यावर संचालक म्हणून काम केले आहे. या कादंबरीत सहकारी साखर कारखानदारी दूध संस्था आणि बाजार समितीचे आतून दर्शन घडविले आहे. सहकाराच्या राजकीय हस्तक्षेपाचा आलेल्या सत्ता स्पर्धेचा महत्त्वकांक्षा, स्वार्थ आणि भ्रष्टाचार यातून ही चळवळ आतून कशी पोखरली गेली आहे. या मोठमोठ्या संस्था सभासंदाचे हित जोपासण्यापेक्षा सत्ताधारी संचालक चेअरमन यांच्या बटीक कशा बनल्या याचे वास्तवपूर्ण चित्रण या कादंबरीत आहे.

कृष्णात खोत 'गावठाण'(२००८) या पहिल्याच कादंबरीने प्रकाश झोतात आले . शेतकरी विशेषत: कोरडवाहू शेतकऱ्याच्या मुलीचा कष्टप्रद प्रवास या कादंबरीत आला आहे. रौंदाळामध्ये ग्रामीण राजकारणाचे वर्तमान वास्तव अधोरेखित केले आहे. राजकरणाने गावचे भलेबुरे काय झाले मागच्या पिढीचे राजकारण, समाजकारण तर आजच्या पिढीचे राजकारण, अर्थकारण हे त्यांनी उलगडून दाखविले आहे. हे दाखवत गावातील सहकारी सेवा सोसायटी आणि दूध डेअरी या संबंधाने सहकाराचे विस्तृत चित्रण आले आहे. सार्वत्रिक सत्य महाराष्ट्राच्या खेडयाचे रौंदाळामध्ये दिसते. रौंदाळा ही गावाची कहाणी सांगत असताना गावातील सहकारातील राजकारण कसे चालते याचे सर्व दिशांनी शोध घेते. हे रौंदाळा कादंबरीचे यश आहे.

भोवळ (२०११) ही पत्रकार हेमंत देसाई यांची कादंबरी सहकाराचा विषय हाताळणारी. त्यातील आर्थिक उलाढालींवर प्रकाश टाकणारी आहे. सहकारी बँकेच्या संबंधाने कथानक आकार घेते. या कादंबरीचा स्थलकाल शहरी आहे. मुंबई शहराचा अवकाश या कादंबरीत येतो. आतापर्यतच्या विवेचनात सहकार संबंधाने ग्रामीण महाराष्ट्राचे समाजजीवन आणि या सहकाराने प्रभावित केलेले असे त्या जीवनाचा भाग असणारे घटक या अनुषंगाने विचार झाला. याही कादंबरीत ग्रामीण समाजाने कष्ट करून बचत केलेल्या ठेवींचे सहकारीबाबू शहरातील शेअर मार्केट, रोख गुंतवणूक यामध्ये काय करतात याचे चित्रण आले आहे. परंतु या कादंबरीचा मुख्य भाग हा हेमंत देसाई यांनी मुंबईसारख्या महाराष्ट्राच्या राजधानीच्या शहरात दादर परिसरातील एक सहकारी बँक बुडाल्यानंतर काय होते याचे वास्तवदर्शी चित्र उभे केले आहे. पेन्शन असणारे नाना या सामान्य माणसाचे आयुष्य केंद्रस्थानी ठेवून बँक बुडण्याच्या घटनेचा परिणाम हा ठेवीदार सामान्य माणूस, शेअर मार्केट, कार्पोरेट, राजकारणी या संबंधाने विस्ताराने नोंदविला आहे. खेड्यापाड्यात राबणाऱ्या असहाय कष्टकऱ्यांचे पैसे सहकाराच्या माध्यमातून गोळा होतात. त्यांनाच कर्ज देताना नियमांचे अवडंबर माजवून दूर ठेवले जाते. असे असून शेअर मार्केटमध्ये मात्र कोणताही विचार न करता, रिझर्व्ह बॅंकचे नियम पायदळी तुडवून कर्ज रोखण्यात कोटयावधी रुपये गुंतवले जातात. परिणामी बँका बुडतात. हा सर्व व्यवहार गावपातळीवरील सामान्यांचे पैसे बचतीच्या धोरणांचा, सत्ताधारी सहकारसम्राट, मुंबई शेअर मार्केट कॉर्पोरेटचे लुटीचे जग आले आहे. या सर्व जीवनचित्रणात हेमंत देसाई यांची अर्थविषयक सजगता दिसते. अत्यंत गुंतागुंतीचे चित्रण अर्थविषयक व्यवहार या कादंबरीत नेमकेपणाने आणि लालित्याचे जोड घेऊन येतात.



Scanned with CamScanner

नव्वदच्या दशकानंतर महाराष्ट्राच्या आणि एकूणच भारताच्या राजकीय पटावर घराणेशाहीचे आक्रमण सुरू झाले याचा जोरकस प्रभाव महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीवर झाला. दोन तीन पिढयांची सत्ता या सहकारी संस्थावर एका एका घराण्याची राहिलेली दिसते. सहकाराला एक मोठा वर्ग महाराष्ट्राच्या राजकीय सत्ता पर्यावरणाला जोडला गेला. राजकीय हितासाठी सहकारी संस्थाचा वापर सुरू झाला आणि सामान्यांच्या विकासासाठी सुरू झालेली ही चळवळ राजकरणाचे प्रवेशद्वार बनली याचे वास्तवदर्शी चित्र या काळातील कादंबऱ्यातून प्रामुख्याने पुढे येते.

मराठी कादंबरी प्रयोगशीलतेने रूपविस्ताराच्या, अभिव्यक्तीच्या अनेक शक्यता आजमावते. विविधांगी आविष्काररीतीने ही कादंबरी वाटचाल करत आहे. असे असले तरी सहकाराचा जीवनाशय मांडणाऱ्या ग्रामीण कादंबरीने वास्तव पद्धतीने, सरधोपट पद्धतीने वास्तवाचे चित्रण करत. सहजतेने आपला अवकाश करत कथानक वाढवत आकारली आहे असे चित्र या काळातील कादंबऱ्यांचे दिसते. एकूणच या काळातील कादंबऱ्यांतून चित्रित झालेला सहकाराचा अवकाश हा समाजकारण आणि राजकारणाचे थेटपणाचे प्रभाव सहकार चळवळीवरती कसे आहेत याचे दिग्दर्शन करतो. एकेकाळी ध्येयवादी पिढीने उभे केलेले सहकाराचे साम्राज्य घराणेशाहीच्या शिरकावाने डळमळीत झाले. राजकीय लाभासाठी सहकारी संस्थाचा राजरोस उपयोग होऊ लागला. साखर कारखानदारीच्या पैशांवरच परिसरातील राजकीय सत्तास्थाने काबीज केली जाऊ लागली. त्यासाठी सहकारी संस्था भ्रष्ट्राचाराचे आगार बनल्या. यातून ज्या सामान्य शेतकऱ्यासाठी हे सर्व होते तोच अगतिक झाला आहे. याचे दिग्दर्शन या काळातील सहकार चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यातून प्रामुख्याने होते. सहकार क्षेत्रात नव्याने निर्माण झालेल्या प्रश्नांची मांडणी आजच्या लेखकाकडून होणे अपेक्षित आहे.

**संदर्भ :**

१. भोळे भा. ल. साहित्य अवकाश, साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्र आ. २००९
२. थोरात हरीचंद्र :कादंबरी एक साहित्यप्रकार, शब्द पब्लिकेशन मुंबई, प्र. आ. २०१०
३. ठाकूर रवींद्र : मराठी ग्रामिण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वि. आ. २००१
४. कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ.१९९६
५. नलगे चंद्रकुमार, संपा., ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, संपा. सुरेश एजन्सी, पुणे प्र. आ. १९९६
६. शिंदे रणधीर, मराठी साहित्य आणि राजकारण,मायमावशी,दिवाळी २०१५
७. मोकाशी सयाजीराजे, ग्रामीण साहित्याचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१५



Scanned with CamScanner